**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र.३) राहाता यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी श्री. प्र.शं. गिरगांवकर)**

**संक्षिप्त फौजदारी खटला नं.२०१२/२०२१** **निशाणी क्र.९**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | – | १६/१०/२०१९ |
| २. | फिर्यादीचा दिनांक | – | १६/१०/२०१९ |
| ३. | फिर्यादीचे नाव व पत्ता | – | पो. स्टे. अधिकारी राहाता पोलीस ठाणे. |
| ४. | आरोपीचे नाव, वय व पत्ता | – | भागवत दादासाहेब लांडगे,<br>वय – ३२ वर्षे, धंदा – व्यवसाय<br>रा. खंडोबागल्ली, राहाता ता. राहाता, जि. अहमदनगर |

**५. अपराधाचा तपशील –**

तुम्ही, दि. १६/१०/२०१९ रोजी रात्री ०१.३० वाजताचे सुमारास खंडोबागल्ली ता. राहाता येथे तुम्हाला राहाता पो.स्टे. हद्दपार प्रस्ताव क्र. ०९/२०१७ महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम ५५ अन्वये मा. पोलीस अधिक्षक अहमदनगर यांचे कार्यालयाकडील आदेश क्रमांक स्था.गु.शा./हद्दपार/१३३५/२०१९ अहमदनगर दिनांक २७/०४/२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशान्वये दोन वर्षाकरीता हद्दपार केलेले असताना सुध्दा तुम्ही पोलीस अधिक्षक यांचे आदेशाचे उल्लंघन करून कोणत्याही सक्षम प्राधिकारी यांची पूर्व परवानगी न घेता राहाता गावात खंडोबागल्ली राहाता येथे स्वतःच्या घरी मिळुन आलात आणि त्याप्रमाणे तुमचेविरूध्द महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ प्रमाणे गुन्हा केल्याचा तुमचेवर आरोप आहे.

आणि याद्वारे मी आपणांस निर्देश देतो की, आपणावर या न्यायालयात नमूद केलेल्या गुन्हयांबद्दल खटला चालविण्यात येईल.

PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR
Digitally signed by PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR
Date: 2025.09.18 23:30:38 +0530

राहाता
दि.१०/०९/२०२५.

(प्र.शं. गिरगांवकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.३), राहाता

**(आरोपीची जबानी वेगळया पानावर नोंदविली आहे.)**